# ३८. दोन महिन्यापेक्षा मोठे बाळ (पाच वर्षापर्यंतचे)– ताप आणि खोकला

(लहान मुलांचे आजार)

| आजाराची पायरी | खाणाखुणा | काय करायला पाहिजे | पाठपुरावा |
|---|---|---|---|
| न्यूमोनिया नाही | बरगडी ओढली जात नाही, श्वसनवेग कमी, २–१२ म. चे बाळ असल्यास ५० पेक्षा कमी. वर्षापुढचे बाळ असल्यास ४० पेक्षा कमी | महिन्यापेक्षा जास्त खोकला असल्यास, हॉस्पिटलला पाठवा. तापासाठी पॅमॉल द्या. आईला सांगा पाजणे आणि उब या दोन गोष्टी सांभाळायला पाहिजे. | जरूर नाही. |
| न्यूमोनिया | बरगडी आत ओढली जात नाही, श्वसनवेग ५० किंवा ४० पेक्षा जास्त (वयाप्रमाणे पहा) | कोझाल द्या, पॅमॉल द्या, आईला वरीलप्रमाणे काळजी घ्यायला सांगा. घरीच ठेवा | १) आराम वाटल्यास पाच दिवस उपचार पूर्ण करा (बरे होण्याच्या खुणा म्हणजे– श्वसनवेग कमी, ताप कमी, भूक सुधारणे)२) फरक नाही – औषध बदला, लक्ष ठेवा३) आजार जास्त झाला? (पीत नाही, बरगडी खेचते, इतर धोक्याची चिन्हे) हॉस्पिटलला पाठवा |
| गंभीर न्यूमोनिया | श्वसनवेग जास्त आहे, शिवाय बरगडी खेचली जाते | ताबडतोब हॉस्पिटलला पाठवा. पाठवताना उबदार गुंडाळा, पाजणे चालू ठेवा, कोझालचा एक डोस देऊन पाठवा | डॉक्टर पुढचे काम करतील |
| अतिगंभीर न्यूमोनिया | (श्वसनवेग जास्त आहेच), पीत नाही, झटके, झोपाळू–गुंगीत, रडत नसतानाही कण्हते आणि श्वासाची शिटी वाजते, बाळ मूळचेचे खूप कुपोषित असल्यास जास्तच धोका आहे. | कोझाल पॅमाल देऊन लगेच हॉस्पिटलला पाठवा. जाताना उबदार ठेवा. | डॉक्टर पुढचे काम करतील |